महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाचे सन २०१९-२० या वर्षाचे (५८वा वार्षिक अहवाल) वार्षिक लेखे विधानमंडळास सादर करण्यास झालेल्या विलंबाची कारणे खालील प्रमाणे आहेत :-

१. महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाचे सन २०१९२०- या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेखे विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहासमोर कंपनी अधिनियम २०१३ मधील कलम ३९५(१) (ब)मधील नियम २३ अन्वये वार्षिक लेखे तयार झाल्यावर लेखा अहवाल विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर करणे बंधनकारक आहे.

वार्षिक लेखे विधान मंडळास सादर करण्यासाठी झालेल्या विलंबाचा घटनाक्रम खालीलप्रमाणे आहे:-

१. महामंडळाच्या वित्त व लेखा विभागातील बहुतांश अधिकारी व कर्मचारी सन १९-२०१८ पर्यंत सेवानिवृत्त झाले आहेत. नवीन अधिकारी व कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आलेली नाही. माहे जून २०१८ ते मे २०२० पासून महामंडळाच्या मुख्य वित्त अधिकारी या पदाचा अतिरिक्त कार्यभार वित्तनियंत्रक, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांच्याकडे देण्यात आला होता. महामंडळाच्या मुख्य वित्त अधिकारी पदावर नियमित अधिकारी नसल्यामुळे व अपु-या मनुष्यबळामुळे लेखे लिहिण्यास विलंब झाला.
२. सन २०२० मध्ये कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे महालेखाकार कार्यालयाने नेमणूक केलेल्या वैधानिक लेखापालामार्फत व महालेखाकार कार्यालयामार्फत लेखापरिक्षण करण्यास विलंब झाला. त्यामुळे पुढील वार्षिक अहवाल तयार करण्यास विलंब झालेला आहे.
३. वार्षिक अहवाल तयार करताना मागील अहवालातील अंतिम शिल्लक पुढील वार्षिक अहवालात प्रारंभिक शिल्लक म्हणून नोंद करण्यात येते. त्यामुळे मागील वार्षिक अहवाल मंजूर झाल्याशिवाय पुढील वर्षाच्या लेख्यांचा ताळेबंद पूर्ण करता येत नाही. त्यामुळे पुढील वर्षाचे वार्षिक अहवाल तयार करण्यास विलंब होत आहे.

त्यामुळे अहवाल विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात विहित मुदतीत सादर करता आलेला नाही. हा विलंब क्षमापित करुन सदर अहवाल महाराष्ट्र विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर करण्यास अनुमती द्यावी, ही विनंती.

(डॉ.श्रीकांत ल. पुलकुंडवार)

उप सचिव (उद्योग), महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाचे सन २०१९-२० या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेखे अंतिमत: तयार होईपर्यंत अनुक्रमानुसार घटनांची माहिती : -

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १. | वार्षिक अहवाल तयार करण्यास घेतलेली तारीख | २४/०६/२०२१ |
| २. | वार्षिक अहवाल तयार झाल्याची तारीख | २८/०३/२०२२ |
| ३. | संचालक मंडळाने अहवालास मान्यता दिल्याची तारीख | ३०/०३/२०२२ |
| ४. | अहवालास मान्यता दिल्यानंतर महालेखापालांना अहवाल केल्याची तारीख | २६/०५/२०२३ |
| ५. | महालेखापाल यांचेकडुन तपासणी अहवाल व लेखा प्रमाणपत्र झालयाची तारीख | २८/११/२०२२ |
| ६. | भागधारकांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अहवाल मंजुरी | ०९/०१/२०२३ |
| ७. | मुद्रनालयास अहवाल छपाईसाठी दिल्याची तारीख | १६/०१/२०२३ |
| ८. | अहवालाची इंग्रजी/मराठी भाषेतील मुद्रीत प्रती प्राप्त झाल्याची तारीख | २७/०६/२०२३ |
| ९. | महामंडळाने स्वीकृत केलेले अहवाल विधानमंडळास करण्यासाठी शासनाकडे पाठविण्याची तारीख | ०३/०७/२०२३ |

(डॉ.श्रीकांत ल. पुलकुंडवार)

उप सचिव (उद्योग), महाराष्ट्र शासन.